RIGHT TO INFORMATION

नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे
कार्यालय नविन प्रशासकीय इमारत, तळ मजला, विधानभवनासमोर पुणे1

---

ईमेल-desk9est@gmail.com वेबसाईट- www.igrmarahashtra.gov.in
दुरध्वनी क्रमांक 26123826 फॅक्स क्रमांक 26129949

---

**क्र.का.9/आस्था-2/** सर्व कार्यासन/जमाअ नेमणूक/2023/**3400**/2023 दि.**26**/10/2023

**वाचा - माहिती अधिकार अधिनियम, 2005 चे कलम 5(1) मधील तरतुद**

**विषय - या कार्यालयातील सर्व कार्यासनामध्ये स्वतंत्र जन माहिती अधिकारी यांची नेमणूक करणेबाबत**

**आदेश-**

ज्याअर्थी नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे हे कार्यालय नोंदणी व मुद्रांक विभागाचे राज्यस्तरीय मुख्य कार्यालय असून या कार्यालयाचे अधिनस्त खाली नमूद केलेली एकुण 11 कार्यासने आहेत.

1. नोंदणी उपमहानिरीक्षक (संगणक) (कार्यासन क्र.3)
2. सहाय्यक नोंदणी महानिरीक्षक तथा कार्यासन अधिकारी क्र.4
3. सहाय्यक नोंदणी महानिरीक्षक तथा कार्यासन अधिकारी क्र.5
4. सहाय्यक नोंदणी महानिरीक्षक तथा कार्यासन अधिकारी क्र.6
5. सहाय्यक नोंदणी महानिरीक्षक तथा कार्यासन अधिकारी क्र.7
6. सहाय्यक नोंदणी महानिरीक्षक तथा कार्यासन अधिकारी क्र.8
7. सहाय्यक नोंदणी महानिरीक्षक तथा कार्यासन अधिकारी क्र.9
8. सहाय्यक नोंदणी महानिरीक्षक तथा कार्यासन अधिकारी क्र.10
9. सहाय्यक नोंदणी महानिरीक्षक तथा कार्यासन अधिकारी क्र.11
10. सहाय्यक नोंदणी महानिरीक्षक तथा कार्यासन अधिकारी क्र.12
11. कायदे सल्लागार तथा कार्यासन अधिकारी क्र.14

कार्यासन क्रमांक 3 वगळता इतर कार्यासनांकरिता सह जिल्हा निबंधक वर्ग-1 संवर्गातील अधिकारी कार्यासन अधिकारी म्हणून कामकाज पहातात व कार्यासन क्र.3 करिता नोंदणी उपमहानिरीक्षक (संगणक) हे प्रमुख म्हणून आहेत.

आणि ज्याअर्थी, माहिती अधिकार अधिनियम 2005 मधील तरतुदीनुसार नोंदणी महानिरीक्षक कार्यालयाकरीता राज्य जन माहिती अधिकारी म्हणून सहाय्यक

नोंदणी महानिरीक्षक तथा कार्यासन अधिकारी क्र.9 यांची नेमणूक करण्यात आलेली आहे.

राज्य जन माहिती अधिकारी तथा कार्यासन अधिकारी क्र.9 यांना नोंदणी महानिरीक्षक कार्यालयात प्राप्त होणाऱ्या सर्व अर्जांबाबत पुढील प्रमाणे कार्यवाही करावी लागते.

1. अर्जाची नोंद माहिती अधिकार नोंदवही मध्ये घेणे.
2. नोंदणी महानिरीक्षक कार्यालय हे राज्यस्तरीय विभाग प्रमुख असल्यामुळे संपुर्ण राज्यातील कार्यालयासंबंधी माहिती मागणेबाबतचे अर्ज व या कार्यालयातील इतर कार्यासनाशी संबंधित अर्जप्राप्त होत असतात, त्या सर्व अर्जांचे अवलोकन करुन अर्जापरत्वे माहिती ज्या कार्यासन अधिकारी यांचेशी संबंधित माहिती आहे त्यांचेकडून माहिती मागविणे अथवा माहिती अधिकार अधिनियमाचे कलम 6(3) खाली माहिती ज्या अन्य जन माहिती अधिकारी यांचेशी संबंधित आहे त्या कार्यालयाकडे विहीत केलेल्या मुदतील वर्ग करणे.
3. संबंधित कार्यासन अधिकारी यांनी माहिती दिलेनंतर अर्जदार यांना माहिती उपलब्ध करुन देणे अथवा फी भरणे अपेक्षित असल्यास मागणी केलेल्या माहितीच्या पृष्ठांची संख्या कळविणे, अर्जदार यांनी सदरची फी अदा केल्यानंतर माहितीच्या पृष्ठांवर माहिती अधिकार अर्जाबाबत शिक्के मारुन पृष्ठांकन करणे इ.

आणि ज्याअर्थी, जन माहिती अधिकारी तथा कार्यासन क्र.9 यांचे कार्यासनातील कर्मचारी यांना नोंदणी महानिरीक्षक कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियमाखालील दाखल होणाऱ्या प्रथम अपिलांचे संस्करण करणेचे कामकाज आहे. यामध्ये अपिलकर्ते यांना सुनावणीची तारीख कळविणे, सुनावणीच्या अनुषंगाने प्रथम अपिलांबाबतचा अपिलीय अधिकारी यांना निर्णय तयार करणे इ. कामकाज हाताळावे लागते.

सन 2021,2022 व माहे ऑगस्ट,2023 अखेर या कार्यालयात दाखल झालेल्या अर्जांची व प्रथम अपिलांची संख्या खालील प्रमाणे आहे.

| **वर्ष/कालावधी** | **अर्ज** | **अपील** |
|---|---|---|
| **माहे जानेवारी-2023 ते माहे ऑगष्ट- 2023** | **561** | **86** |
| **2022** | **828** | **99** |
| 2021 | 644 | 40 |

आणि ज्याअर्थी, उपरोक्त अर्ज व अपिलांची संख्या पाहाता मासिक **सरासरी 65 ते 70** च्या दरम्यान अर्ज दाखल होतात. तसेच दाखल होणारी अपीलाची संख्या एका महिन्याला **सरासरी 10 ते 11** आहे. सदर दाखल होणारी अपीले ही

वेगवेगळया कार्यासनाशी संबंधित असल्याने त्या प्रत्येक अपीलासंदर्भातील संबंधित कार्यासनाकडून नस्ती मागवून त्यावर अभ्यास करुन जन माहिती अधिकारी यांना सुनावणी दरम्यान उत्तर द्यावे लागते. **माहिती अधिनियमाखालील अर्ज व अपिले निकाली काढण्यासाठी निश्चित कालमर्यादा विहीत केलेली आहे.** तसेच या कार्यालयातील माहिती अर्जाचे संदर्भात मा. आयूक्त, राज्य माहिती आयोग, राज्य खंडपीठ, पुणे यांचे दाखल होणारे द्वीतीय अपीलाच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा कार्यासन अधिकारी क्र.9 यांनाच उपस्थित रहावे लागते जरी विषय इतर कार्यासनाशी संबंधित असेल तरीदेखील. त्यावर पारित होणा-या मा.आयूक्तांच्या आदेशावरील कार्यवाही देखील करावी लागते.

तसेच वरीलप्रमाणे नमूद केल्यानुसार सर्व प्रक्रीयेमध्ये एका अर्जावर कार्यवाही करणेसाठी वेळ लागत असल्याने संबंधित अर्जदार यांना माहिती देण्यामध्ये विलंब होण्याची शक्यता नाकारता येत नाही त्यामुळे विहित मुदतीत माहिती न दिल्याने जन माहिती अधिकारी यांना बरेच वेळा प्रथम व व्दीतीय अपिलामध्ये जन माहिती अधिकारी यांना दोषी धरण्यांत येवून प्रसंगी त्यांचे विरुध्द कार्यवाही सुध्दा प्रस्तावित करणेबाबत आदेशात नमूद करण्यांत येते.

आणि ज्याअर्थी, राज्य जन माहिती अधिकारी तथा कार्यासन अधिकारी क्र.9 हे राज्यातील सर्व प्रवर्गाचे आस्थापना अधिकारी म्हणून कामकाज हाताळतात, अधिनस्त कार्यालयाकडून माहिती मागविणे त्याचे पृथ:करण करणे, एकत्रित करुन शासनास सादर करणे, शासनाकडून मागणी केलेली माहिती तात्काळ सादर करणे, विधिमंडळात मा.सदस्यांनी उपस्थित केलेल्या विविध आयुधांबाबत संबंधित कार्यासनाकडे अग्रेषित करणे त्याचा ताळमेळ घेणे, विभागातील कार्यालयांकरीता सुशोभिकरण, नविन बांधकाम, आस्थापना विषयक सर्व कामकाज, विभागिय चौकशी, रजा मंजूरी इ.कामकाज करणे ह त्यांच्या पदांचे कर्तेव्ये आहेत. सदरची सर्व कामे हाताळण्यासोबतच जन माहिती अधिकारी म्हणून या कार्यालयातील सर्व कार्यासनाशी संबंधित माहिती अधिकार अर्ज, प्रथम अपील तसेच द्वीतीय अपील अर्ज यासाठी वेळ द्यावा लागतो. त्यामुळे त्यांचेवर कामाचा अतिरिक्त ताण येतो.

आणि ज्याअर्थी, **माहिती अधिकार अधिनियम, 2005 चे कलम 5(1) मध्ये "या अधिनियमान्वये माहिती मिळण्याची विनंती करणाऱ्या व्यक्तींना माहिती देण्यासाठी, त्याच्या अखत्यारीतील सर्व प्रशासकीय युनिटांमध्ये किंवा कार्यालयांमध्ये आवश्यक असतील तेवढ्या जास्तीत जास्त अधिकाऱ्यांना, यथास्थिति, केंद्रीय जन माहिती अधिकारी किंवा राज्य जन माहिती अधिकारी म्हणून पदनिर्देशित करील."** अशी

तरतुद आहे. सदरची तरतूद व वर नमुद केल्यानुसार सध्याचे जन माहिती अधिकारी तथा कार्यासन अधिकारी क्र.9 यांचेकडील कामकाज पहाता नोंदणी महानिरीक्षक कार्यालयामध्ये एकापेक्षा जास्त जन माहिती अधिकारी यांची नियुक्ती करणे कालानुरुप आवश्यक आहे.

कार्यासन क्र.3 करिता नोंदणी उपमहानिरीक्षक (संगणक) हे प्रमुख म्हणून आहेत या कार्यासना मध्ये सह जिल्हा निबंधक वर्ग-1 संवर्गातील पद मंजूर नाही, तसेच वर्ग-2 चे पद देखील मंजूर नाही. तथापि, सदर कार्यासनामध्ये दुय्यम निबंधक श्रेणी-१ यांना जन महिती अधिकारी म्हणून घोषित करण्यांत येत आहे.

त्याच प्रमाणे त्यांना सहाय्य करणे करिता संबंधित कार्यासनातील जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे स्तरावर दुय्यम निबंधक श्रेणी-1 अथवा वरिष्ठ लिपीक यांना सहाय्यक जन माहिती अधिकारी म्हणून घोषित करणेत यावे.

त्याअर्थी, नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे कार्यालयाकरीता जन माहिती अधिकारी व सहाय्यक जन माहिती अधिकारी म्हणून पुढीलप्रमाणे नेमणूक करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कार्यासनाचे नाव | जन माहिती अधिकारी | सहाय्यक जन माहिती अधिकारी |
|---|---|---|---|
| 1 | कार्यासन क्र.3 | दुय्यम निबंधक श्रेणी-1 | संबंधित कार्यासनातील वरिष्ठ लिपीक |
| 2 | कार्यासन क्र.4 | सहाय्यक नोंदणी महानिरीक्षक तथा कार्यासन अधिकारी क्र.4 | संबंधित कार्यासनातील दुय्यम निबंधक श्रेणी-1/ वरिष्ठ लिपीक |
| 3 | कार्यासन क्र.5 | सहाय्यक नोंदणी महानिरीक्षक तथा कार्यासन अधिकारी क्र.5 | संबंधित कार्यासनातील दुय्यम निबंधक श्रेणी-1/ वरिष्ठ लिपीक |
| 4 | कार्यासन क्र.6 | सहाय्यक नोंदणी महानिरीक्षक तथा कार्यासन अधिकारी क्र.6 | संबंधित कार्यासनातील दुय्यम निबंधक श्रेणी-1/ वरिष्ठ लिपीक |
| 5 | कार्यासन क्र.7 | सहाय्यक नोंदणी महानिरीक्षक तथा कार्यासन अधिकारी क्र.7 | संबंधित कार्यासनातील दुय्यम निबंधक श्रेणी-1/वरिष्ठ लिपीक |
| 6 | कार्यासन क्र.8 | लेखाधिकारी | संबंधित कार्यासनातील दुय्यम निबंधक श्रेणी-1/ वरिष्ठ लिपीक |
| 7 | कार्यासन क्र.9 | सहाय्यक नोंदणी महानिरीक्षक तथा कार्यासन अधिकारी क्र.9 | संबंधित कार्यासनातील दुय्यम निबंधक श्रेणी-1/ वरिष्ठ लिपीक |

| | | | |
|---|---|---|---|
| 8 | कार्यासन क्र.10 | सहाय्यक नोंदणी महानिरीक्षक तथा कार्यासन अधिकारी क्र.10 | संबंधित कार्यासनातील दुय्यम निबंधक श्रेणी-1/ वरिष्ठ लिपीक |
| 9 | कार्यासन क्र.11 | सहाय्यक नोंदणी महानिरीक्षक तथाकार्यासन अधिकारी क्र.11 | संबंधित कार्यासनातील दुय्यम निबंधकश्रेणी-1/ वरिष्ठ लिपीक |
| 10 | कार्यासन क्र.12 | सहाय्यक नोंदणी महानिरीक्षक तथा कार्यासन अधिकारी क्र.12 | संबंधित कार्यासनातील दुय्यम निबंधक श्रेणी-1/ वरिष्ठ लिपीक |
| 11 | कार्यासन क्र.14 | कायदे सल्लागार ( कार्यासन क्र.14) | संबंधित कार्यासनातील दुय्यम निबंधक श्रेणी-1/ वरिष्ठ लिपीक |

नोंदणी महानिरीक्षक कर्यालयातील जन माहिती अधिकारी यांचे विरोधातील प्रथम अपिले चालविणेकरिता प्रथम अपिल अधिकारी म्हणून नोंदणी उपमहानिरीक्षक (मुख्यालय),पुणे यांना अपिलीय अधिकारी म्हणून नियुक्त केलेले आहे, त्यामध्ये कोणताही बदल केलेला नाही,

**सही- (हिरालाल सोनवणे) भा.प्र.से.**
**नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे**

**प्रति,**

सर्व कार्यासन अधिकारी, नोंदणी महानिरीक्षक कार्यालय, पुणे

**प्रत -**

1. मा अप्पर मुख्य सचिव, महसुल (मुद्रांक व नोंदणी), महसुल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई
2. मा. आयूक्त , राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे
3. सह नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक अधिक्षक (मुख्यालय), महाराष्ट्र राज्य, पुणे
4. अप्पर मुद्रांक नियंत्रक, प्रधान मुद्रांक कार्यालय, मुंबई
5. सह संचालक नगररचना (मुल्यांकन) महाराष्ट्र राज्य, पुणे
6. नोंदणी उपमहानिरीक्षक (संगणक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
7. सर्व नोंदणी उपमहानिरीक्षक
8. व्यवस्थापक, शासकीय छायाचित्र नोंदणी कार्यालय, पुणे
9. सर्व सह जिल्हा निबंधक (नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक यांचे मार्फतीने)
10. सर्व दुय्यम निबंधक (सह जिल्हा निबंधक यांचे मार्फतीने)

**निर्गमित-**

**(उदयराज चव्हाण)**
**नोंदणी उपमहानिरीक्षक (मुख्यालय),**
**महाराष्ट्र राज्य, पुणे**